# पदव्युत्तर पदवी परिक्षेत देगलूर महाविद्यालयाचे यश

देशोन्नती वृत्तसंकलन

**देगलूर :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या उन्हाळी २०२४ मध्ये झालेल्या पदव्युत्तर परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या निकालामध्ये देगलूर महाविद्यालयाच्या पदव्युत्तर वर्गाच्या अनेक विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.

महाविद्यालयातील एम .ए.इतिहास या वर्गात सर्वप्रथम धनरवाड नागेश तुकाराम ६०.८२ टक्के, द्वितीय शिंदे मयुरी पांडुरंग ५७.१२ टक्के , तृतीय कांबळे अनिल मारोती ५५.९४ टक्के घेवून या विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले आहे. तर एम. ए. हिंदी या वर्गात सर्वप्रथम कांबळे सुप्रिया दिलीप ६५.७० टक्के, द्वितीय गव्हाणे शिल्पाराणी सोपान ६५.४१ टक्के तर तृतीय बोईनवाड मनिषा ५८.२५ टक्के गुण मिळविले आहेत. एम. ए. मराठीतून सर्वप्रथम गायकवाड शुभांगी मारोती ७८.९४ टक्के, द्वितीय गायकवाड बालाजी मारोती ७२.७१ टक्के, तृतीय मोरे बालाजी अशोकराव ६८.२४ टक्के यांनी यश प्राप्त केले आहे. तसेच एम. ए. लोकप्रशासन यातून सर्वप्रथम रोकडे संतोषी बाबाराव ६९.५३ टक्के, द्वितीय अलापूरे अविनाश मारोती ६९.४७ टक्के व तृतीय जाधव क्रांती शिवाजी ६८.८२ टक्के मिळविले आहेत. तर एम. ए . राज्यशास्त्र या वर्गात सर्वप्रथम कर्णे आकांक्षा लक्ष्मण ७६.२९टक्के, द्वितीय कर्णे दीपा लक्ष्मण ७२.७१ टक्के, आणि तृतीय कऱ्हाडे पल्लवी अरुण ७१ टक्के, गुणवत्ता सिद्ध केली आहे. एम. एससी. रसायनशास्त्र या वर्गात सर्वप्रथम फारुकी आफ्रिन बेगम जिलानी ७१.६८ टक्के, द्वितीय जाधव पूजा बालाजी ७०.८० टक्के, तृतीय जवेरिया टी.शेख सयद ७०.४० टक्के, तसेच एम. एससी .भौतिकशास्त्र या वर्गात सर्वप्रथम रुही तरुन्नम ७५.१२ टक्के, द्वितीय भुताळे हर्ष ७४.२४ टक्के, तृतीय एकाळे भाग्यश्री ७२.५६ टक्के मिळविले. एम. एससी. वनस्पतीशास्त्र या वर्गात सर्वप्रथम भगनुरे आरती बालाजी ७८.०८ टक्के, द्वितीय जाधव विजया रामेश्वर ७७.४८ टक्के, तृतीय राठोड सविता बालाजी ७६.७६ टक्के, तर एम. कॉम. या वर्गात सर्वप्रथम बसापुरे प्रीती बाबुराव ७५.९४ टक्के, द्वितीय यान्नवार गीतांजली बालाजी ७१.४७ टक्के, तृतीय भोईवार सविता मारोती ७१.४१ टक्के यांनी यश प्राप्त केले आहे.(ता.प्र.)

Scanned with OKEN Scanner